आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

३० ऑगस्ट २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- पालघर जिल्ह्यातल्या वाढवण बंदरासह विविध विकास कामांचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रारंभ

- शहर आणि गावातली दरी दूर करुन आर्थिक समावेशनासाठी वित्तविषयक तंत्रज्ञानानं मोलाची कामगिरी बजावली असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- भारताचा स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर यंदा ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहण्याचा मूडीजचा अंदाज

- राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा पडल्या प्रकरणी एका आरोपीला अटक

**आणि**

- मोसमी पावसाचा मुक्काम यंदा लांबण्याची शक्यता

<><><><><>

पालघर जिल्ह्यात वाढवण इथं ७६ हजार कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या बंदराचं भूमीपूजन,२१८ मत्स्यपालन विकास योजना यासह विविध विकास योजनांचं उद्घाटन आणि लोकार्पण आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. वाढवण हे आशिया खंडातलं हे सर्वात मोठं बंदर असेल आणि जगातल्या आघाडीच्या १० बंदरामध्ये याचा समावेश असेल. या बंदरामुळे १२ लाख लोकांना प्रत्यक्ष तसंच अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे. डहाणू इथं हा कार्यक्रम सुरु आहे.

वाढवण मधे एकाही प्रकल्पग्रस्ताला सरकार वाऱ्यावर सोडणार नाही असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या कार्यक्रमात सांगितलं. जेएनपीटीच्या तिप्पट मोठं बंदर असेल आणि महाराष्ट्र पुढची ५० वर्षं दळणवळण क्षेत्रात आघाडीवर

राहील असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. या बंदराला पूर्वी विरोध झाला होता. मात्र प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे हा प्रकल्प आकाराला येत आहे असं ते म्हणाले. या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होणार असून त्यात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येणार आहे,  असं फडणवीस यांनी जाहीर केलं. या प्रकल्पामुळे सागरी व्यापार क्षेत्रात देशाची ताकद वाढणार असल्याचं केंद्रीय जलवाहतूक आणि बंदरविकास मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी सांगितलं. केंद्रीय पशुधन आणि मत्स्यव्यवसायविकास मंत्री राजीव रंजन ,राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यक्रमाला उपस्थित आहेत.

**<><><><><>**

शहर आणि गावातली दरी दूर करुन आर्थिक समावेशनासाठी वित्तविषयक तंत्रज्ञानाने मोलाची कामगिरी बजावली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत वित्त आणि तंत्रज्ञान विषयक ग्लोबल फिनटेक फेस्टला संबोधित करत होते. गेल्या १० वर्षांत ३१ अब्ज डॉलरची गुंतवणूक फिनटेकमध्ये झाली असून फिनटेक स्टार्टअप्समध्ये ५०० टक्के वाढ झाल्याचं त्यांनी सांगितलं. बँक व्यवहारांचं संगणकीकरण झालं, गेल्या १० वर्षात ५३ कोटी  जनधन खाती उघडली गेली त्यात २९ कोटींपेक्षा जास्त खाती महिलांची आहेत असं सांगून ते म्हणाले की फिनटेकमुळे महिला सक्षमीकरणालाही हातभार लागला आहे. थेट लाभ हस्तांतरण होत असल्याने भ्रष्टाचाराला जागी राहिली नाही असं मोदी यांनी सांगितलं.

भारतीय रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास आणि इन्फोसिसचे सहसंस्थापक क्रिश गोपालकृष्णन यांचीही भाषणं कार्यक्रमात झाली.

**<><><><><>**

भारताचा जीडीपी, अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर चालू वर्षात ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहील, असा अंदाज मूडीज या पतमानांकन संस्थेनं वर्तवला

आहे. याआधी, यंदा मूडीजनं व्यक्त केलेल्या अंदाजात हा दर ६ पूर्णांक ८ दशांश टक्के होता.

२०२५ साठीचा सुधारित अंदाजही मूडीजनं प्रसिद्ध केला आहे. पुढच्या वर्षात भारताचा जीडीपी वाढीचा दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्क्याऐवजी ६ पूर्णांक ६ दशांश टक्के राहील असं त्यात म्हटलं आहे. २०२४ च्या पहिल्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ ७ पूर्णांक ८ दशांश टक्के दरानं झाली. औद्योगिक आणि सेवा क्षेत्रानं लक्षणीय वाढ नोंदवल्याचं मूडीजचं निरीक्षण आहे.

<><><><><>

पदव्युत्तर शिक्षणासाठीची प्रवेश परीक्षा जेएएम च्या प्रवेश परीक्षांसाठीचे अर्ज ३ सप्टेंबरपासून भरता येणार आहेत. यासाठी आयआयटी दिल्लीने एक नोंदणी संकेतस्थळ तयार केलं आहे. या प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून २०२५-२६ च्या शैक्षणिक वर्षांच्या विविध अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवता येईल. प्रवेश परीक्षा २ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार असून येत्या ११ ऑक्टोबर पर्यंत त्यासाठीचे अर्ज भरता येतील. ही परीक्षा संगणक आधारीत होणार असून यामध्ये जैवरसायन शास्त्र, रसायनशास्त्र, अर्थशास्त्र, भूगर्भविज्ञान, गणित, गणितीय सांख्यिकी आणि भौतिकशास्त्र या विषयांच्या ७ प्रश्नपत्रिका असतील.

<><><><><>

वक्फ घटनादुरुस्ती विधेयक २०२४ च्या अभ्यासाकरता नेमलेल्या संयुक्त संसदीय समितीची बैठक आज नवी दिल्लीत सुरु आहे. यामध्ये संबंधितांची मतं जाणून घेतली जात असून आज मुंबईच्या ऑल इंडिया सुन्नी जमायुतुल उलेमा आणि नवी दिल्लीच्या इंडियन मुस्लीमस फॉर सिविल राईट्स या संघटनांचे प्रतिनिधी समितीसमोर आपलं म्हणणं मांडत आहेत. वक्फ च्या कायदादुरुस्तीसाठी या संयुक्त संसदीय समितीची स्थापना केली असून, समितीची पहिली बैठक या महिन्यात २२ ऑगस्ट रोजी झाली होती. या समितीमध्ये एकूण ३१ सदस्य आहेत.

**<><><><>**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबईची घटक संस्था असलेल्या बालरंगभूमी परिषद, मुंबई या संस्थेने ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी राज्यातल्या लोककलांवर आधारित जल्लोष लोककलेचा हा बालकलावंतांचा महोत्सव आयोजित केला आहे. या बाबतची माहिती आज शाखेच्या अध्यक्षांनी वार्ताहर परिषदेत दिली. या कार्यक्रमाचं उद्घाटन बालरंगूमी परिषद मध्यवर्तीच्या अध्यक्षा नीलम शिर्के यांच्या हस्ते होणारअसून खासदार प्रणिती शिंदे यांच्या उपस्थितीत महोत्सवाचा समारोप होईल. या महोत्सवासाठी बार्शी, पंढरपूर, मंगळवेढा, सोलापूर आदि भागातून दोनशे बालकलाकारांनी सहभाग नोंदवला आहे. या महोत्सवातून २५ संघ आणि ५० बालकलाकार निवडले जाणार आहेत.

**<><><><>**

सिंधुदुर्गात मालवण इथल्या राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा पडल्याच्या प्रकरणी पोलिसांनी चेतन पाटील या एका आरोपीला अटक केली आहे. त्याला कोल्हापुरातून ताब्यात घेतल्याचं सिंधुदुर्ग पोलिसांनी सांगितलं. चेतन पाटील हा पुतळा बनवण्याचं कंत्राट मिळालेल्या मेसर्स आर्टिस्ट या कंपनीचा सल्लागार म्हणून काम पाहात होता. या कंपनीचा मालक आणि पडलेल्या मूर्तीचा शिल्पकार जयदीप आपटे, हा या प्रकरणातला दुसरा आरोपी असून, तो अद्याप फरार आहे.

**<><><><>**

मोसमी पावसाचा मुक्काम यंदा लांबण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. साधारणपणे सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून परतीचा मान्सून सुरु होतो. परंतु यंदा'ला निना'च्या प्रभावामुळे तयार होणाऱ्या कमी दाबामुळे सप्टेंबरअखेर किंवा ऑक्टोबरपर्यंत मान्सून लांबण्याची शक्यता आहे. मान्सूनचा

मुक्काम वाढला तर खरीप पिकांना त्याचा फायदा होणार असून, खरीप लागवडीचं क्षेत्रही त्यामुळे वाढणार आहे.

<><><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेमध्ये रोहन बोपण्णा आणि मॅथ्यू एब्डेन या भारतीय-ऑस्ट्रेलियन जोडीनं पुरुष दुहेरीच्या पहिल्या फेरीत नेदरलँड्सच्या जोडीचा ६-३, ७-५ असा पराभव केला. आता या जोडीचा दुसऱ्या फेरीचा सामना आज आर. कार्बालेस बाएना आणि एफ. कोरिया यांच्याशी होणार आहे. मिश्र दुहेरीत रोहन बोपण्णा आणि इंडोनेशियाची अल्डिला सुतजियादी यांची जोडी उद्या मैदानात उतरणार आहे. पुरुष दुहेरीच्या इतर सामन्यांमध्ये भारताचा एन. श्रीराम बालाजी आणि युकी भांब्री यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. महिला एकेरीत अग्रमानांकित इगा श्वियांतेकनं जपानच्या एना शिबारा हिच्यावर ६-०, ६-१ असा सहज विजय मिळवला. पुरुष एकेरीत अग्रमानांकित यानिक सिनर यानं अमेरिकेच्या ॲलेक्स मिशेलसेनवर ६-४, ६-०, ६-२ अशी मात केली. तर जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या माजी विजेत्या कार्लोस अल्काराजला द नेदरलँड्सच्या बोटिक व्हान दे शांडसुल्प यानं थेट सेट्समध्ये नमवलं.

<><><><><>

मुंबई - गोवा महामार्गाचं निकृष्ट दर्जाचं काम अनेकांच्या मृत्यूस जबाबदार ठरल्याबद्दल चेतक इन्टरप्रायजेस या कंपनीच्या संचालक आणि अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चेतक एन्टरप्रायजेसचे व्यवस्थापकीय संचालक हुकुमचंद जैन, सर व्यवस्थापक अवधेश सिन्हा आणि प्रकल्प अभियंता सुजित कावळे यांच्यावर काल माणगाव पोलिसांनी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला. या महामार्गाच्या इंदापूर ते वडपाले या टप्प्याचं काम कंपनीनं निकृष्ट दर्जाचं केल्याने १७० अपघात झाले असून त्यात ९७ जणांचा मृत्यू झाला तर २०८ जण जखमी

झाले होते. रस्ता उभारणीच्या कामात निष्काळजीपणा केल्यामुळे त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असून अभियंता सुजित कावळे यांना अटक करण्यात आले आहे.

<><><><><>

सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीनं आखाती देशांतून कार्यरत असलेल्या आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ तस्कर जसमीत हकीमजादा प्रकरणी काल देशभरात मुंबई, सोलापूर, दिल्ली, अमृतसर, जालंधर, आणि इंदूर अशा दहा ठिकाणी छापे टाकले. पी एम एल ए कायद्यातल्या तरतुदींनुसार ही कारवाई करण्यात आली.

दुबईत राहणारा जसमीत भारतात अंमली पदार्थांचा अवैध व्यापार चालवत असल्याचं  ईडीच्या तपासात निष्पन्न झालं आहे. अमेरिकेच्या कायद्याअंतर्गत 'महत्त्वपूर्ण परदेशी अंमली पदार्थ तस्कर' म्हणूनही जसमीतची नोंद आहे.

<><><><><>

सीमा भागात शांतता राखण्याबद्दल भारत आणि चीन यांच्यात सहमती झाली आहे. भारत-चीन सीमा प्रश्नी सल्लामसलत आणि समन्वयासाठी कार्यरत संयुक्त यंत्रणेची ३१वी बैठक काल चीनमध्ये बीजिंग इथं झाली. या बैठकीत यावर सहमती झाली. सीमा भागात शांतता प्रस्थापित करणं आणि प्रत्यक्ष नियंत्रण रेषेचा आदर राखणं, ही बाब दोन्ही देशांमधले द्विपक्षीय संबंध पूर्वपदावर आणण्यासाठीचा आधारभुत मुद्दा असल्याचा पुनरुच्चारही दोन्ही देशांच्या प्रतिनिधींनी केला.

//<><><><><>//